“निश्चित केलेल्या पाणलोट क्षेत्रातील वनेत्तर सार्वजनिक/सामूहिक जमिनीवर वृक्ष लागवड करणे” या योजनेसाठी सन २०१५-१६ करिता निधी वितरीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांक :- साववि -२०१५/प्र.क्र. १२१/फ-११
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
तारीख: २२ जानेवारी, २०१६.

<u>वाचा</u> - १) प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा महासंचालक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्रमांक: -कक्ष-१/यो-अनुदान/प्र.क्र. ७/१५-१६/२०७४, दि. २८.१०.२०१५.
२) शासन परिपत्रक वित्त विभाग क्रमांक : -अर्थसं-२०१५/ प्र.क्र. ८५/अर्थ-३, दि. १७.०४.२०१५.
३) शासन परिपत्रक वित्त विभाग क्रमांक : -अर्थसं-२०१५/प्र.क्र. २०१/अर्थ-३, दि. १.०१.२०१६.
४) शासन परिपत्रक वित्त विभाग क्रमांक : -अर्थसं-२०१५/प्र.क्र. ८५/अर्थ-३, दि. १२.०१.२०१६.

<u>प्रस्तावना :-</u>

“निश्चित केलेल्या पाणलोट क्षेत्रातील वनेत्तर सार्वजनिक/सामूहिक जमिनीवर वृक्ष लागवड करणे” या योजनेंतर्गत रु. १७१.०० लक्ष इतका नियतव्यय अर्थसंकल्पित करण्यात आला आहे. त्यापैकी ७०% च्या मर्यादेत रु. ८३.७९ लक्ष इतका नियतव्यय वितरीत करण्यात आला आहे. सबब, संदर्भ क्रमांक १ वरील पत्रान्वये या योजनेसाठी रु. १७१.०० लक्ष इतका नियतव्यय उपलब्ध करुन देण्याची विनंती करण्यात आली होती.

सन २०१५ च्या हिवाळी अधिवेशनात मंजूर नियतव्यय रु. १७१.०० लक्ष पैकी अर्थसंकल्पित न करण्यात आलेला नियतव्यय रु. ५१.३० लक्ष पुरवणी मागणीद्वारे अर्थसंकल्पित करण्यात आला आहे. संदर्भ क्रमांक ४ व ५ वरील परिपत्रकानुसार वित्त विभागाने दिलेल्या सुचनेनुसार पुरवणी मागणीच्या ५०% म्हणजे रुपये २५.६५ लक्ष निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

सामाजिक वनीकरण विभागाकडून राबविण्यात येत असलेली “निश्चित केलेल्या पाणलोट क्षेत्रातील वनेत्तर सार्वजनिक/सामूहिक जमिनीवर वृक्ष लागवड करणे” या योजनेच्या अंमलबजावणीसाठी रू. २५.६५ लक्ष निधी सन २०१५-१६ साठी वितरीत करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर निधी साठी नियंत्रक अधिकारी म्हणून प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर हे राहतील. त्यांच्याकडे हा निधी सुपूर्द करण्यात येत आहे. मंजूर निधीचे जिल्हानिहाय वाटप करण्यास महासंचालक,सामाजिक वनीकरण यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. या योजनेतंर्गत घ्यावयाच्या कामाची अंमलबजावणी कृती आराखड्याप्रमाणे, विहित

कार्यपध्दतीनुसार आणि ठरविलेल्या मुदतीत करण्याबाबत दक्षता घ्यावी. याबाबत सविस्तर मार्गदर्शक सूचना क्षेत्रीय अधिकाऱ्यांना द्याव्यात आणि अंमलबजावणीबाबत वेळोवेळी आढावा घ्यावा. मंजूर निधीपेक्षा जास्त खर्च होणार नाही याची नियंत्रक अधिकारी यांनी दक्षता घ्यावी.

३. जिल्हानिहाय वितरीत तरतुदीची माहिती व राबविण्यात आलेल्या कार्यक्रमाची/झालेल्या खर्चाचा तपशील शासनास दरमहा विहित प्रपत्रात सादर करण्यात यावा. तसेच योजनेचे संनियंत्रण प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर आणि महासंचालक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या मार्फत व्हावे.

४. सदर योजनेतंर्गत होणारा खर्च खाली नमूद केलेल्या लेखाशीर्षाखाली सन २०१५-१६ मध्ये मंजूर अर्थसंकल्पीत निधीतून खर्ची टाकण्यात यावा.

“मागणी क्र.सी-७, २४०६, वनीकरण व वन्यजीवन, (योजनांतर्गत) ०१ वनीकरण,१०२ सामाजिक व क्षेत्रीय वनीकरण,(०१) (०२) निश्चित केलेल्या पाणलोट क्षेत्रातील वनेत्तर सार्वजनिक/सामूहिक जमिनीवर वृक्ष लागवड करणे (२४०६ ८५९८) ३३- अर्थसहाय्य.”

५. सदर शासन निर्णय संदर्भ क्र. ३ येथे नमूद वित्त विभागाचे परिपत्रक क्र. वित्त विभाग क्रमांक :- अर्थसं-२०१५/प्र.क्र८५/अर्थ-३, दि. १२.०१.२०१६ मधील सूचनांनुसार प्रशासकीय विभागास प्रदान केलेल्या अधिकारांन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०१२२१२१३३४८५१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vijay Ramchandra Khedekar

Digitally signed by Vijay Ramchandra Khedekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Under Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Vijay Ramchandra Khedekar
Date: 2016.01.22 12:14:06 +05'30'

(विजय खेडेकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मुख्य सचिव.
२. मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव.
३. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग.
४. अपर मुख्य सचिव (नियोजन), नियोजन विभाग.
५. प्रधान सचिव (जलसंपदा), जलसंपदा विभाग, मंत्रालय
६. सचिव, (लाभक्षेत्र विकास), जलसंपदा विभाग, मंत्रालय.
७. प्रधान सचिव (महसूल), महसूल व वन विभाग.
८. सचिव (वने), महसूल व वन विभाग.
९. मा. मंत्री (वने) यांचे खाजगी सचिव.
१०.प्रधान मुख्य वनसंरक्षक, (वनबल प्रमुख),नागपूर.

११.अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
१२. प्रधान मुख्य वनसंरक्षक व महासंचालक, सामाजिक वनीकरण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१३. मुख्य वनसंरक्षक व उप महासंचालक, सामाजिक वनीकरण वृत्त, कोकण ठाणे, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर .
१४. सर्व उपसंचालक, सामाजिक वनीकरण विभाग, (सर्व जिल्हे)
१५. महालेखापाल, (लेखापरीक्षा / लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १ व २ , मुंबई व नागपूर,
१६. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
१७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई -४०० ०३२.
१८.निवासी परिक्षा लेखा अधिकारी,मुंबई
१९. वित्त विभाग, व्यय-०९, अर्थसंकल्प- ०६ मंत्रालय, मुंबई-३२
२०. कार्यासन अधिकारी, फ-२,फ-७,महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
२१. कार्यासन अधिकारी, ब-१,महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
२२.सह सचिव/उप सचिव/अवर सचिव (सर्व), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
२३.निवडनस्ती/फ-११.